


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १८३ ●गुरूवार, दि.०२ ऑक्टोबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजाराची मदत द्या : आ.रोहित पवार

## बीड तालुक्यातील अतिवृष्टीने नुकसान झालेल्या गावांची केली पाहणी



**बीड । प्रतिनिधी**


मराठवाड्यासह बीड जिल्ह्यात अतिवृष्टी आणि ओल्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून त्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची सरसकट मदत करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे. आ.रोहित पवार हे बुधवार दि.(०१) रोजी बीडमध्ये अतिवृष्टीने नुकसान झालेल्या गावांची पाहणी करण्यासाठी आले होते. त्याअगोदर त्यांनी बीडचे जिल्हाधिकारी यांचसोबत ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● रोहित पवारांनी पुराच्या प्रवाहात वाहून गेलेल्या तरुणाच्या कुटुंबाची घेतली भेट

बीड मतदारसंघातील चौसाळा ते पिंपळगाव घाट गावाला जोडणाऱ्या रस्त्यावर अतिवृष्टीच्या काळात पुलावरून प्रवास करत असताना श्री. स्वप्निल विक्रम शिंदे हे दुर्दैवाने पुराच्या प्रवाहात वाहून गेले. अद्याप त्यांचा शोध सुरूच आहे. आ.रोहित पवार यांच्यासमवेत आ.संदीप क्षीरसागर यांनी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी प्रशासनाला शोध मोहिमेला गती द्यावी अशी विनंती रोहित पवार यांनी केली.

### ● आ.रोहित पवारांनी बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांसोबत घेतली आढावा बैठक

बीड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. जमिनीवरील माती वाहून गेली, घरात पाणी शिरून संसार उध्वस्त झाला, पिके नष्ट झाली – असे न भूतो न भविष्यति संकट शेतकऱ्यांवर ओढवले आहे. या कठीण प्रसंगी शेतकरी बांधवांसोबत ठाम उभे राहत, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार) प्रदेश सरचिटणीस तथा कर्जत–जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी बीड जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन शासनाने तातडीने व भरीव मदत द्यावी तसेच नागरिकांच्या पुनर्वसनाची गरज असून नागरिकांना शासनाच्या माध्यमातून तात्काळ सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची मागणी केली.










# श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टला वन विभागाची ४ हेक्टर जागा प्रदान

## देवेंद्र फडणवीस यांची घोषणा ; धनंजय मुंडे यांचा यशस्वी पाठपुरावा

**मुंबई । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्ट परिसरातील वन विभागाची ४ हेक्टर जमीन भक्त निवास, रुग्णालय, प्रशिक्षण केंद्र आदींच्या उभारणीसाठी केंद्र सरकारकडून उपलब्ध करून देण्यात आली असून याबाबतची अधिसूचना केंद्रीय पर्यावरण व वन विभागाने प्रसिद्ध केली आहे. माजी मंत्री



आमदार धनंजय मुंडे यांनी यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला होता, त्यास भगवान गडाच्या स्थापना दिनाच्या पूर्व संध्येस यश आले आहे. गडाचे महंत न्यायचार्य डॉ. नामदेव शास्त्री यांनी अनेक वर्षांपासून ही जमीन हस्तांतरित होण्यासाठी मागणी केली होती. विजयादशमी म्हणजेच भगवान गडाचा स्थापना दिवस, आज विजयादशमीच्या पूर्व संध्येला ▶▶ उर्वरित पान २ वर

# १ नोव्हेंबरपासून राज्यातील उसाचा गळीत हंगाम सुरु होणार, मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी समोर आली आहे. यंदाचा उसाचा गळीत हंगाम येत्या १ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. आज राज्याच्या मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक मुंबईत पार पडली. या बैठकीत हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

# वडवणीत महाविकास आघाडीचा शेतकरी बैलगाडी आक्रोश मोर्चा

## सरकारने उध्वस्त शेतकऱ्यांचा अंत पाहु नये: राजेंद्र मस्के

### ● घोषणा पेलण्याची धमक सरकारने दाखवावी..

**बीड । प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे मराठवाड्यातील शेतकरी प्रचंड अडचणीत आहे. शेतकऱ्यांना न्याय द्यावा लागेल. वडवणी तालुका छोटा असला तरी येथील शेतकरी जागृत आहेत. राज्यातील प्रत्येक नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवण्यासाठी वडवणीत



आक्रोश मोर्चाची सुरुवात झाली. लाखो हेक्टर शेतजमीन, खरीप पिके, पशुधनाचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचा आर्थिक कणा मोडला, शेतकऱ्यांचे संसार उध्वस्त झाले. उध्वस्त शेतकऱ्यांचा अंत न पाहता ओला दुष्काळ जाहीर करावा. निवडणुकीपूर्वी केलेल्या घोषणांची अंमलबजावणी करून शेतकऱ्यांना कर्जमुक्त करावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी वडवणी येथे शेतकरी आक्रोश मोर्चात केले आहे. ओला दुष्काळ तात्काळ जाहीर करावा. ,सरसकट शेतकऱ्यांना कर्ज मुक्ती (कर्जमाफी) करावी, शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार अनुदान

▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडच्या कंकालेश्वर मंदिरासह औंधचे संग्रहालय राज्याचा अमूल्य सांस्कृतिक ठेवा ; संवर्धन करताना दर्जा, सौंदर्यासह पर्यावरणाचा समतोल राखावा: उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई । प्रतिनिधी**

बीड येथील कंकालेश्वर मंदिर व सातारा जिल्ह्यातील औंध येथील संग्रहालय हे महाराष्ट्राचा सांस्कृतिक व ऐतिहासिक अमूल्य ठेवा आहे. या वारशाचे संवर्धन करणे ही आपली जबाबदारी असून, ▶▶ उर्वरित पान २ वर




# नारायणड संस्थान (धाकटी पंढरी) येथे दसरा मेळाव्यासाठी येणाऱ्या भाविक आणि नागरिकांसाठी उपाय योजना करा : आ.संदीप क्षीरसागर

### ● मनोज जरांगे यांची उपस्थितीत दसरा मेळावा

**बीड । प्रतिनिधी**

नारायणगड (धाकटी पंढरी) येथे होणाऱ्या दसरा मेळाव्यासाठी येणाऱ्या भाविक आणि नागरिकांसाठी उपाय योजना करण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

महंत प्रेममूर्ती ह.भ.प.श्री. शिवाजी महाराज आणि संघर्षयोद्धा मनोज जरांगे यांच्या उपस्थितीत नारायणगड (धाकटी पंढरी) येथे दसरा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. याठिकाणी



मोठ्या संख्येने भाविक आणि नागरिक येणार आहेत. त्यामुळे पोलिस विभागाकडून वाहतूक व्यवस्था, गर्दी नियंत्रण, सुरक्षेची काटेकोर व्यवस्था, आरोग्य विभागाकडून प्राथमिक उपचार केंद्र, रुग्णवाहिका तसेच वैद्यकीय पथकांची उपलब्धता करून द्यावी, एस.टी.महामंडळाकडून अतिरिक्त बस गाड्यांची सोय व वाहतुकीची व्यवस्था करावी, तहसील कार्यालय व महसूल विभागाकडून आवश्यक शासकीय देखरेख, समन्वय, जिल्हा परिषद व ग्रामपंचायत स्तरावरून स्वच्छता, पाणीपुरवठा, विद्युत व्यवस्था व इतर सोयीसुविधा देण्यात याव्यात. तसेच संपूर्ण कार्यक्रमाचे निरीक्षण व देखरेख यासाठी संबंधित अधिकारी यांच्या वतीने अंमलबजावणी करण्यात यावी. वरील प्रमाणे सर्व संबंधित विभागांनी परस्पर

▶▶ उर्वरित पान २ वर

# कपिलधार वाडीतील घराला तडे, रस्त्याला पडल्या भेगा

## ग्रामस्थ भयभीत ८० जणांचे स्थलांतर, तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दिली भेट

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील कपिलधार वाडीमध्ये मागील काही दिवसांपासून घरांना तडे पडणे आणि रस्त्याला मोठमोठ्या भेगा पडल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कपिलधार वाडी ही पायथ्याशी वसलेली असून येथे १०० घरे आणि सुमारे ५०० लोकसंख्या आहे. रात्री १२ वाजता अनेक गावकर्यांनी सुरक्षिततेसाठी तीर्थक्षेत्रात

▶▶ उर्वरित पान २ वर



# जमलेल्या तमाम हिंदू मातांनो, भगिनींनो आणि... राज्यात आज कुणाकुणाची डरकाळी?

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रासाठी दरवर्षी दसरा मेळावा फार महत्त्वाचा आहे. कारण याच दसरा मेळाव्याच्या दिवशी राज्यातील राजकारणाला कलाटणी देणारी योजना, विधानं केली जातात. दरवर्षी नागपुरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा दसरा मेळावा असतो. मुंबईत शिवसेनेच्या दोन्ही गटांचाही दसरा मेळावा भरतो. भाजपाच्या नेत्या पंकजा मुंडे यादेखील भगवान भक्तीगड सावरगाव येथे आपला वेगळा दसरा मेळावा घेतात. तर मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे हेदेखील नारायण गडावर आपला दसरा मेळावा आयोजित करत आहेत. त्यामुळेच आता दसऱ्याच्या दिवशी म्हणजेच २ ऑक्टोबर रोजी कोणत्या नेत्याचा दसरा मेळावा कुठे होणार? सोबतच यावेळच्या दसरा मेळाव्याची नेमकी काय तयारी चालू आहे, ते पाहुया

### ● उद्धव ठाकरेंच्या मेळाव्याची जय्यत तयारी

शिवसेनेची शकलं होण्याआधी दरवर्षी मुंबईतील शिवाजी मैदानावर या पक्षाचा मोठा दसरा मेळावा आयोजित केला जायचा. मात्र आता या पक्षाचे दोन गट पडल्यावर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा दसरा मेळावा दादरमधील शिवाजी मैदानावर आयोजित




केला जातो. यावेळीदेखील हा दसरा मेळावा शिवाजी मैदानावरच होणार आहे. यंदाचा दसरा मेळावा अनेक अर्थांनी वेगळा ठरण्याची शक्यता आहे. कारण या मंचावर मनसेचे प्रमुख राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्याची शक्यता आहे. दोन्ही नेते युतीचीही घोषणा करू शकतात, असे सांगितले जात आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे दसरा मेळाव्यानिमित्त २ ऑक्टोबर रोजी आपल्या भाषणात काय बोलणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### ● शिंदेच्या मेळाव्याचे ठिकाण बदलले

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेदेखील आपला दसरा मेळावा आयोजित करतात. आपल्या दसरा मेळाव्यात ते शिवसैनिकांना संबोधित करतात. या वर्षी त्यांचा दसरा ▶▶ उर्वरित पान २ वर

### आजारी असलो तरी दसरा मेळाव्याला जाणार: जरांगे



मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची तब्येत अचानक बिघडली आहे, त्यांना उपचारासाठी छत्रपती संभाजीनगरमधील एका रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. समोर आलेल्या माहितीनुसार मनोज जरांगे पाटील हे व्हायरल तापाने त्रस्त आहेत. आज नारायण गड येथे मनोज जरांगे पाटील यांचा दसरा मेळावा होणार आहे, आजारी असलो तरी दसरा मेळाव्याला जाणार असं त्यांनी स्पष्ट केलं आहे, दरम्यान राज्यात हैदराबाद गॅझेट लागू झाल्यानंतर जरांगे पाटील यांचा हा पहिलाच मेळावा आहे, राज्यात सध्या मराठा विरोधात ओबीसी असं वातावरण निर्माण झालेलं आहे. या सर्व पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील काय बोलणार हे पहाणं महत्त्वाचं ठरणार असून, या मेळाव्याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे.

# दसरा, गांधी जयंती आणि बीड जिल्ह्याची सद्यस्थिती : संघर्ष, परंपरा आणि आशेचा दीप

बीड जिल्हा सध्या अतिवृष्टीच्या छायेत आहे . गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे नद्या , नाले तुडुंब भरून वाहत आहेत ; अनेक शेतं पाण्याखाली गेली आहेत ; घरं, रस्ते, शिवार यांत पाणी साचले आहे . शेतकरी हवालदिल झाले आहे . पिके पाण्याखाली गेल्याने आर्थिक नुकसान झाले आहे . पावसाच्या धारा कितीही जोरात कोसळल्या तरी मनातील आशेचा दिवा विझू देऊ नका . आजही गावोगावी पाणी साचले आहे , गावांचा संपर्क तुटलेला आहे , रस्ते बंद झाले आहेत . प्रशासन , पोलीस दल , महसूल विभाग सतत कार्यरत आहे . ग्रामपंचायत अधिकारी , सहाय्यक कृषी अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी यांच्यासह अधिकारी वर्ग मदतीसाठी दिवस–रात्र धावपळ करत आहे . मदतीसाठी नियंत्रण कक्ष सतत सुरू आहे . दसरा किंवा विजयादशमी हा हिंदू संस्कृतीतील एक अत्यंत महत्त्वाचा सण आहे . प्राचीन काळापासून हा सण चांगल्याचा वाईटावर विजय दर्शवतो . रामायणानुसार प्रभू श्रीरामांनी याच दिवशी रावणाचा वध करून सीतेची सुटका केली आणि अयोध्येला परतताना हा दिवस विजयाचा उत्सव म्हणून साजरा करण्यात आला . महाभारतातील पांडवांनी अज्ञातवास संपल्यानंतर आपल्या



शस्त्रांची पूजा करून पुन्हा युद्धात विजय मिळवण्यासाठी हा दिवस निवडला होता . त्यामुळे दसऱ्याला विजयादशमी असे नाव पडले . दसरा म्हणजे वाईट प्रवृत्तींचा पराभव आणि नवी सुरुवात करण्याचा दिवस . या दिवशी लोक रावण दहन करतात, सोन्याची पाने देवांना अर्पण करतात आणि एकमेकांना देतात, जे समृद्धी आणि ऐक्याचे प्रतीक आहे . रावण फुंकला की वाईट जळून खाक झाले, आता अंतःकरणातील भीती, राग, लोभ यांना ही जाळून टाका .

२ ऑक्टोबर हा दिवस महात्मा गांधींचा जन्मदिन आहे . राष्ट्रपिता म्हणून ओळखले जाणारे मोहनदास करमचंद गांधी हे सत्य, अहिंसा आणि त्यागाचे मूर्तिमंत उदाहरण होते . त्यांचे विचार आजही आपल्याला मार्गदर्शन करतात . गांधीजींनी दिलेली शिकवण – सत्य : जीवनात सत्याला सर्वोच्च स्थान द्या, अहिंसा : हिंसेऐवजी शांततेने संघर्ष करा, स्वावलंबन : खादी, स्वदेशी आणि आत्मनिर्भरतेचा मार्ग निवडा, सहिष्णुता : सर्व धर्म, जात, समाज यांना समानतेने पाहा . आजच्या परिस्थितीत गांधीजींच्या शिकवणीचा खरा अर्थ आपल्याला जाणवतो . पूरस्थितीत एकमेकांना सहकार्य करणे, खोट्या अफवांवर विश्वास न ठेवणे, संयम राखणे हेच त्यांचे तत्त्वज्ञान होते . तुम्ही जगात पाहू इच्छिता तो बदल स्वतः घडवा ! हा गांधीजींचा मंत्र आज अधिक महत्त्वाचा ठरतो .

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची अवस्था गंभीर आहे . घरात पाणी , शेतात पाणी , जनावरांसाठी चाराचा प्रश्न , अन्नधान्याची टंचाई – अशा वेदनादायक परिस्थितीतही बीडकर खंबीरपणे उभे आहेत . तहसीलदार शेळके यांनी भावनिक आवाहन केले : तरुण मित्रांनी पुढे यावे ; आपले हात मदतीसाठी पुढे करावेत . वृद्ध, निराधार, आजारी नागरिक यांना आधी मदत करावी . कोणत्याही परिस्थितीत जीवित हानी होणार नाही, याची काळजी सर्वांनी घ्यावी . आपण सर्व खंबीर आहात ; आपल्यातले बळ मला माहीत आहे . या संकटावर आपण एकत्रितपणे मात करू . प्रशासन तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे . मदतीसाठी व संपर्कासाठी आपण नेहमी तयार आहोत . कधीही संपर्क साधा . दसरा फक्त रावण दहन करण्याचा सण नाही , तर मनातील निराशा , भीती आणि अशक्तपणा जाळून टाकण्याचा दिवस आहे . आज या संकटाच्या काळात आपण एकत्र येऊन गावोगावी एकतेची मशाल पेटवूया . उद्याची पहाट सोनेरी आहे, आजचे ढग काळे आहेत तरी आशेचा किरण उगवेलच . गावात स्वच्छतेचे काम सुरू करावे, शेतातील नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे तातडीने करून द्यावेत, पूर ओसरल्यानंतर पिण्याचे पाणी उकळून वापरावे, मुला–मुलींना सुरक्षित ठिकाणी ठेवावे, प्रशासनाच्या अधिकृत सूचनांचे पालन करावे . गांधीजींनी दिलेला स्वावलंबनाचा मंत्र आजही तितकाच उपयुक्त आहे . गावोगावी लोकांनी एकत्र येऊन परस्पर साहाय्य करावे , पूरग्रस्तांना अन्नधान्य , कपडे , औषधे यांची मदत द्यावी . सत्याग्रह हा केवळ संघर्ष नाही , तो स्वच्छ समाजासाठीची शपथ आहे . पावसाचा जोर ओसरलाच पाहिजे, पण आपल्या मनातील जिद्दवाढली पाहिजे . दसऱ्याचा रावण जळतोच , पण मनातील भीती, नैराश्य आणि वेदना देखील जळल्या पाहिजेत . गांधीजींच्या मार्गावर चालून आपण पुन्हा एक नवा दिवस घडवूया . सोनेरी भवितव्याची पहाट आपल्यासाठी उगवेल – या विश्वासानेच दसरा आणि गांधी जयंती साजरी करूया . या दसऱ्याला खरेदी कमी करा पण आशेचा दिवा जास्त लावा . गांधी जयंतीच्या दिवशी स्वतःशी वचन द्या – मी माझ्या गावासाठी, माझ्या लोकांसाठी, माझ्या जिल्ह्यासाठी सदैव तयार राहीन !

**– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार , बीड**

◆ पान ४ वरून पुढे...

## 'शेतकरी बैलगाडा...

यांच्यासाठी १५ हजार रुपये मदत, पिक विमा तात्काळ द्यावा, शेतीमालाला हमीभाव द्यावा , पी.एम .सी.एम. सन्मान निधी च्या वंचित शेतकऱ्यांना तात्काळ अनुदान द्यावे यासाठी व इतर मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात आला. शेतकरी हा देशाचा कणा आहे, त्याच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरलो आहोत सदर मागण्या पुर्ण करण्यासाठीची ही लढाई शेवटपर्यंत लढणार आहोत. यावेळी मोर्चात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे नेते मोहन जगताप, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाअध्यक्ष जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, वडवणी तालुक्याचे शिवसेनेचे तालुकाध्यक्ष विनायक मुळे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे तालुका अध्यक्ष महादेव जमाले, राष्ट्रीय काँग्रेस पार्टी वडवणी तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर आंधळे व महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## धनगर समाज...

करण्यात आले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी शासनाला इशारा देताना सांगितले की, मुख्यमंत्र्यांनी कोर्ट–कचेरी, समित्या यांच्या भानगडीत न पडता धनगर आणि धनगर हे एकच आहेत, असा शासन निर्णय घ्यावा. तसेच राज्यपालांच्या स्वाक्षरीसह शिफारसपत्र राष्ट्रपतींकडे पाठवून आरक्षणाचा मार्ग मोकळा करावा. आंदोलनात समायोजित रविंद्र निर्मळ, बाळासाहेब मोरे पाटील, कृष्णा पितळे, बाळासाहेब मुळे,प्रमुख वक्तव्यांनी आपली मते मांडली. उपस्थितांनी दीपकभाऊ बोराडे यांच्या मागणीस पाठिंबा दर्शवला. निवेदन नेकनुर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे यांनी स्विकारले. यावेळी सहाय्यक फौजदार गोविंद बडे, पोलिस अंमलदार साळुंके, रामेश्वर जवळे, होमगार्ड उबाळे, कुलकर्णी उपस्थित होते. या आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव,राजेभाऊ गिरे, बाळकृष्ण थोरात,बालु मुळे,शहादेव धलपे, रामदास मुळे, अमोल पितळे,

◆ पान ४ वरून पुढे...

कल्याण मुळे, शेख समीर, कैलास येडे, सुनील मुळे, रोहित तागड, प्रमोद गिरे ,आजिनाथ राहींज , रेवणनाथ मंचरे ,गिरे कृष्णा, एकनाथ तागड, कल्याण कोकाटे, जयदेव गिरे ,भगवान लगास ,अशोक वाणी ,दिलीप ढास ,अक्षय वाणी ,कदम भागवत, बाबासाहेब गिरे ,सर्जेराव घरत ,केशव गिरे मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवत आंदोलन शांततेत पार पाडले.

## म्हाळसजवळा...

टपाली सादर करावा. असे अप्पर सचिव मळेकर यांच्या सहीने आदेशाचे पत्र रोहयो आयुक्त, बीड जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले आहे. म्हाळस जवळा येथील पाणंद रस्ते, खडीकरण व इतर सर्व ५४ सार्वजनिक कामांची चौकशी लावण्यासंदर्भात उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर खांडे यांनी रोहयो मंत्री भरत शेठ गोगावले यांची भेट घेऊन तक्रार दिली होती. या तक्रारीची दखल तत्काळ घेण्यात आली आहे.

## लोकनेते सुंदररावजी...

मागील हंगामाचा आढावा घेत शेतक–यांच्या ऊसाला हमी भावापेक्षा जादा भाव दिल्याचे सांगितले. तसेच चालु गळीत हंगामात आ. प्रकाशदादा व मा. धैर्यशीलकाका यांच्या मार्गदर्शनाखाली. १० लाख मे.टन ऊस गाळपाचे उद्दिष्ठ ठेवण्यात आले. तसेच सिरप इथेनॉल २.७० कोटी लिटर व बी. हेवी इथेनॉल १.३० कोटी लिटर असे एकुण ४.०० कोटी लिटर इथेनॉल उत्पादन उद्दिष्ठ आणि को. जन प्रकल्पाव्दारे १०.६३ कोटी युनीट विज उत्पादन व ६.५१ कोटी युनीट विज निर्यातीचे उद्दिष्ठ ठेवल्याचे चेअरमन श्री. विरेंद्रदादा सोळंके यांनी सांगितले. हा हंगाम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शेतक–यांसह कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी, कामगार यांची मेहनत मोठी

◆ पान ४ वरून पुढे...

असल्याचे मत व्यक्त केले. तर व्हा. चेअरमन श्री. जयसिंगभैय्या सोळंके म्हणाले की, स्व. आप्पांनी चालु केलेला हा कारखाना मतदार संघातील शेतक–यांच्या जिवनात आर्थीक क्रांती घडवुन आणणारा ठरला असुन मा.दादा व काकांनी पुढे समर्थपणे चालवत स्थापनेपासुन एकही खंड पडू न देता अविरत गाळप हंगाम चालुच ठेवणारा हा मराठवाडयातील नामांकित कारखाना असुन दादा व काकांच्या मार्गदर्शनाखाली भविष्यातील तीन दशकही हा कारखाना असाच अविरत चालु ठेवण्याची आपणा सर्वांची जबाबदारी असुन ऊसाला भाव देण्यातही आपला वरचा क्रमांक असल्याचे सांगुन यंदा कारखाना व्यवस्थापनाने ठरविलेले १० लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ठ पार पाडण्यासाठी सर्वांची कसोटी लागणार आहे. मात्र आपण सर्वजण ते सहज पार पाडुन या कारखान्याचे महाराष्ट्रातच नव्हे तर परराज्यातही नावलौकीक हाईल असा आशावाद जयसिंगभैय्या यांनी व्यक्त केला. आशिर्वादपर मार्गदर्शन करताना ह.भ.प.श्री. महादेव महाराज चाकरवाडीकर यांनी स्व. अप्पांच्या आशिर्वादाने मा.दादा व मा. काका व विरेंद्रदादा, जयसिंगभैय्या हे समर्थपणे त्यांचा समाज सेवेचा वारसा पुढे नेत असुन सोळंके परिवारानें अनेकांच्या जिवनात आर्थीक प्रगतीची नवी पहाट आणली असल्याने या घराण्याचे नाव अनंतकाळ राहणारे असुन या कारखान्याच्या बॉयलर अग्निप्रदिपन कार्यक्रमास व दसरा सणानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास सर्व संचालक मंडळ, परिसरातील विविध संस्थाचे पदाधिकारी, कारखान्याचे कार्यकारी संचालक आर.सी. बडगुजर यांच्यासह सर्व खातेप्रमुख, कर्मचारी, कामगार सर्व ठेकेदार व कार्यक्षेत्रातील सभासद, केले. उस उत्पादक शेतकरी मोठया प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संचालक छगनराव जाधव यांनी केले

## सांडस चिंचोली...

जाण्यासारखी परिस्थिती नसताना होडीने सर्व डॉक्टर मंडळी व सर्व मेडिसिन

◆ पान ४ वरून पुढे...

घेऊन माजलगाव येथील सुप्रसिध्द लेंडाळ मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व क्रिटिकल केअर सेंटर यांच्या वतीने सांडस चिंचोली येथील हनुमान मंदिर या ठिकाणी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिरामध्ये शुगर, बीपी, ताप, खोकला, सर्दी आणि ईतर आजार व काही तरुणांना वृद्धांना पुराच्या पाण्यामुळे इजा झाल्या होत्या अशा सांडस चिंचोलीतील सर्व नागरिकांच्या तपासणी व प्रथम उपचार करण्यात आले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी व सर्व नागरिकांच्या तपासणी सेवे साठी लेंडाळ मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल चे सर्वेसर्वा डॉ.प्रताप लेंडाळ, डॉ.अभिजित सोळंके, दिगंबर कदम, अक्षय सरोदे, राघव टाकणखार व आदिंनी परिश्रम घेतले. सांडस चिंचोली गावचे सरपंच नारायण शेजूळ, श्रीकृष्ण शेजूळ, सोमा चंदनशिव, पांडुरंग माने, अशोक कदम व सर्व गावकऱ्यांनी मोलाची साथ दिली. कधी नव्हे तर यंदा चांगले पीक उगवून शेतकऱ्यांच्या हातात चांगले पैसे पडतील अशी आशा शेतकऱ्यांना लागलेली असताना निसर्गाच्या हेकेखोरपणामुळे झालेल्या ढगफुटी, अतिवृष्टीने तालुक्यातील छोट्या मोठ्या नद्यांना महापूर आला आणि होत्याचं नव्हतं झालं. त्यात शासन मदत जाहीर करण्यास व देण्यास करत असलेला विलंब यामुळे शेतकरी पुरा खचला आहे. सरकारने लवकरात लवकर सरसकट पंचनामे करून एकरी ५० हजार रुपये मदत जाहीर करावी असे नागरिकांतून शेतकऱ्यातून बोलले जात आहे.

## पिंपळनेर भागात...

करण्यात आली. यानिमित्ताने घरोघरी फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली. मंडळांच्या ठिकाणी विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या हस्ते देवीची आरती झाली. तर त्यानंतर दांडिया–भक्तीगीतांचे कार्यक्रम असे विविध कार्यक्रम आयोजित केले होते. काहींनी देवीच्या मूर्तीसोबतची छायाचित्रे तर काहींनी सजावटीचे व्हिडिओ अपलोड केले. नवरात्रोत्सवातील आनंदी क्षण प्रत्येकाने उत्साहाने शेअर केले.

◆ पान 9 वरून पुढे...

## शेतकऱ्यांना हेक्टरी....

आढावा बैठक घेतली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत करावी. त्यांना सरसकट नुकसान भरपाई द्यावी. शेतकऱ्यांना मदत करण्याची हेच योग्य वेळ असून शासनाने तात्काळ नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केली. कपिलधारवाडी येथे जाऊन नुकसान पाहणी केली. याठिकाणी रस्ते,जमीन व डोंगर खचले आहे. जमिनीला मोठ्या भेगा पडल्या आहेत. माळीणसारखी गंभीर घटना घडण्याची शक्यता असल्याने स्थानिक नागरिकांचे जीवन आणि संपत्ती धोक्यात आली आहे. याठिकाणी आ.रोहित पवार यांनी परिस्थितीची पाहणी करत पुनर्वसनाची गरज असल्याचे सांगितले. तसेच आपत्ती व्यवस्थापनाकडून संरक्षण भिंत बांधून देण्याची निर्देश दिले. बीड तालुक्यातील हिंगणी खुर्द या गावात जाऊन नुकसानीची पाहणी केली व नागरिकांशी संवाद साधला. यावेळी स्थानिक नागरिकांनी आपल्या व्यथा मांडल्या व शासनाच्या माध्यमातून तात्काळ मदत मिळवून देण्याची मागणी केली.

## श्री क्षेत्र....

हा निर्णय घोषित झाल्याने गडाच्या भक्तांमध्ये आनंदाचे वातावरण असून, या निर्णयासाठी धनंजय मुंडे यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय पर्यावरण व वन मंत्री भूपेंद्र यादव, त्याचबरोबर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा गडाच्या सर्व भक्तांच्या वतीने आभार मानले आहेत.

## १ नोव्हेंबरपासून....

कर्नाटकातील कारखान्यांबरोबर सीमेलगतच्या कारखान्यांना हंगाम सुरु करण्याची मुभा देण्यात आली आहे. महाराष्ट्रातील ऊस कर्नाटकात जाऊ नये म्हणून राज्य सरकारनं हा निर्णय घेतला आहे. या हंगामात एकूण १ हजार २५० लाख टन ऊस उपलब्ध असेल असा अंदाज देण्यात आला आहे. मुख्यमंत्री निधीसाठी दरवर्षी घेण्यात येणारे प्रतिटन ५ रुपयांवरुन १५ रुपये करण्यात आल्याची माहिती देखील देण्यात आली आहे. देशातील काही राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात ऊसाचं क्षेत्र आहे. त्यामुळं दरवर्षी भारतात मोठ्या प्रमाणात साखरेचं उत्पादन होतं. जगातील दुसऱ्या क्रमांकाचा साखर उत्पादक देश म्हणून जगभरात भारताची ओळख आहे. दरम्यान, यावर्षी १ नोव्हेंबरपासून उसाचा गळीत हंगाम सुरु होणार आहे. या नवीन पीक हंगामात निर्यातीला परवानगी देण्यासाठी पुरेसा अतिरिक्त साखरेचा साठा ठेवण्यात येणार असल्याची माहिती एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने दिली आहे. भारतातील साखर निर्यातीमुळे जागतिक किमतींवर दबाव येऊ शकतो, परंतु यामुळे भारत सरकारला देशांतर्गत साखरेच्या किमतींना आधार मिळण्यास आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या पिकासाठी किमान आधारभूत किंमत मिळण्यास मदत होईल.

## वडवणीत महाविकास...

जाहीर करावे,पावसात मृत्युमुखी पडलेल्या गायी, म्हशी, बैलांना तात्काळ ५०,००० द्या, शेळी, मेंढी १५ हजार रुपये द्या,पिक विमा तात्काळ देण्यात यावा, पिम, म, सी, म,चे वंचित शेतकऱ्यांना अनुदान तात्काळ

◆ पान 9 वरून पुढे...

वितरीत करावं, खतांवरील जीएसटी रद्द करावी.. अशा महत्त्वपूर्ण मागण्यांसाठी,वडवणी महविकास आघाडी च्या वतीने तहसील कार्यालयावर शेतकरी आक्रोश मोर्चा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के,राष्ट्रवादी नेते मोहन दादा जगताप, काँग्रेसचे नेते दादासाहेब मुंडे, जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, शिवसेनेचे विनायक मुळे, प्रकाश जेधे, सुग्रीव मुंडे, श्रीराम मुंडे, महादेवराव जमाले, ज्ञोनाबा आंधळे, मानवी हक्क अभियान विष्णू मजमुल,प्रहार संघटनेचे संकेत लंगडे, शेतकरी नेते जगदीश फरताडे,शाम सावंत , संजय धपाटे, आकाश सावंत, युवराज शिंदे, शेख इब्राहिम, बापूसाहेब घोलप,खलिल पठाण,शहादेव लोंढे, बाळासाहेब राऊत,सुरेश भोरे, बंडु नाईकवाडे, संभाजी दराडे,शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी पार्टीचे प्रमुख पदाधिकारी यांच्या नेतृत्वात वडवणीत वसंतराव नाईक साहेब चौक तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. वडवणी माजलगाव मतदार संघातील शेतकरी बहुसंख्येने सहभागी झाले होते. मोर्चाला शेतकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

## बीडच्या कंकालेश्वर ...

ते करताना कामे दर्जेदार आणि हेरिटेज पद्धतीने व्हावीत, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिले. कामांच्या गुणवत्तेत कोणतीही तडजोड होऊ नये तसेच या स्मारकांच्या परिसरातील एकही झाड तोडले जाणार नाही, याची विशेष दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती कक्षात झालेल्या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार अध्यक्षस्थानी होते. बैठकीत कंकालेश्वर मंदिर, बीड व श्री भवानी चित्रसंग्रहालय व ग्रंथालय, औंध (जि. सातारा) या राज्य संरक्षित स्मारकांच्या जतन–दुरुस्तीच्या कामांचे सादरीकरण करण्यात आले. या बैठकीस सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव किरण कुलकर्णी, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुरातत्त्व विभागाचे संचालक तेजस गर्गे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव आबासाहेब नागरगोजे, दूरदृष्य प्रणालीद्वारे बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पुणे येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता राजेंद्र रहाणे उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, बाराव्या शतकातील यादवकालीन कंकालेश्वर मंदिराच्या जतन–दुरुस्तीकरिता शासनाने ९ कोटी १४ लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे.

## नारायणड संस्थान....

समन्वय साधून आवश्यक ती कारवाई करावी जेणेकरून दसरा मेळावा शांततेत, निस्तबद्ध व यशस्वीपणे पार पडेल. सदर मेळाव्यास कोणताही अडथळा येऊ नये शिस्तबद्ध व सुरक्षित वातावरण निर्माण व्हावे यासाठी आवश्यक सर्व शासकीय उपायोजना करण्यात याव्यात या मागणीसाठी बीड जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, बीड, उपविभागीय अधिकारी बीड/पाटोदा, तहसीलदार बीड/शिरूर कासार, जिल्हा आरोग्य अधिकारी बीड, जिल्हा शल्य चिकित्सक

◆ पान 9 वरून पुढे...

बीड,अधीक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं.ली.बीड,विभाग, नियंत्रक एस.टी महामंडळ बीड यांच्याकडे आ.संदीप क्षीरसागर यांनी पत्रकातून मागणी केली आहे.

## कपिलधार वाडीतील...

स्थलांतर केले, तर काही जण पाहुण्यांकडे गेले. ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तात्पुरती स्थलांतराची व्यवस्था आणि नुकसान भरपाईसाठी मागणी केली आहे. कपिलधार वाडीची माळीण होते की काय ? अशी भिती निर्माण झाली असून, त्यामुळे गावकर्यांनी रात्र जागून घालवली. ज्या लोकांना शक्य होते त्यांनी रात्रीच स्थलांतर केले, मात्र उरलेल्या लोकांसाठी प्रशासनाने तातडीने मदत करावी, असे ग्रामस्थांनी सांगितले. रस्त्याला पडलेल्या भेगा व घरांवरील तडे पाहण्यासाठी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी घटनास्थळी भेट दिली. त्यांच्यासोबत वरिष्ठ भू–वैज्ञानिक शंकर काळे देखील होते. भू–वैज्ञानिकांच्या मते, मागील काही दिवसांत झालेल्या पावसामुळे जमीन साठवलेले पाणी ५०–६० मीटर खोलवर गेले आहे. त्यामुळे जमीन जो कमकुवत भाग आहे तिथून हवा बाहेर पडल्याने घरांना व रस्त्याला तडे पडले आहेत. भू–वैज्ञानिक काळे यांनी ग्रामस्थांना सांगितले की, या भागात आणि परिसरात भूकंपाची कोणतीही नोंद नाही. त्यामुळे सध्या कोणताही धोका नाही, ग्रामस्थांनी घाबरू नये. दरम्यान, आमदार संदीप क्षीरसागर आणि आमदार रोहित पवार यांनी देखील ग्रामस्थांची भेट घेतली आणि त्यांची काळजी व्यक्त केली. काही नागरिकांचे स्थलांतर केले गेले असून, प्रशासनाने त्यांच्या पुनर्वसनासाठी जिल्हाधिकार्यांकडे प्रस्ताव पाठविला आहे. ग्रामस्थांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासन सतर्क असून, भविष्यात अशा प्रकारच्या धोके टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. प्रशासन सर्तक, तूर्तास धोका नाही–तहसीलदार: बीड तालुक्यातील कपिलधार वाडीतील घरांना तडे पडल्याची व रस्त्यांवर मोठ्या भेगा निर्माण झाल्याची माहिती मिळाल्यानंतर तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी वरिष्ठ भू–वैज्ञानिक शंकर काळे यांना सोबत घेऊन घटनास्थळी भेट दिली. भू–वैज्ञानिकांच्या मते, मागील काही दिवसांत झालेल्या पावसाचे पाणी जमीन ५० ते ६० मीटर खोलवर शिरल्यामुळे जमिनीचा कमकुवत भाग फुगल्यासारखा झाला आहे. त्यातून हवा बाहेर पडल्यामुळे घरांना आणि रस्त्याला तडे पडले आहेत.

## जमलेल्या तमाम...

मेळावा मुंबईतील आझाद मैदानावर होणार होता. आता मात्र त्यांच्या मेळाव्याचे ठिकाण बदलण्यात आले असून तो यंदा आझाद मैदानाऐवजी नेस्को सेंटरमध्ये होणार आहे. केवळ एमएमआर क्षेत्रातील शिवसैनिकांसाठी नेस्को येथे दसरा मेळावा होणार आहे. उद्धव ठाकरे यांच्याप्रमाणेच एकनाथ शिंदे हेदेकील रात्री सात ते नऊ वाजेच्या दरम्यान दसरा मेळाव्यासाठी आलेल्यांना संबोधित करत असतात. त्यामुळे यावेळच्या दसरा मेळाव्यात शिंदे नेमकं काय बोलणार ? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

### • मनोज जरांगे यांचा दसरा मेळावा ९०० एकरवर

मराठा आरक्षणासाठी लढा देणाऱ्या मनोज जरांगे यांचाही बीड जिल्ह्यात दसरा मेळावा होणार आहे. बीडच्या नारायणगडावर या दसरा मेळाव्याची तयारी सुरू झालेली आहे. दरवर्षी नारायणगडावर पारंपरिक पद्धतीने दसरा मेळावा संपन्न होत असतो. गेल्यावर्षी देखील लाखोंच्या उपस्थितीत मनोज जरांगे यांचा दसरा मेळावा संपन्न झाला होता. या दसरा मेळाव्याची ३५० एकरवर तयारी सुरू असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. पार्किंसह एकूण ९०० एकर जमीन दसरा मेळाव्यासाठी तयार केली जात आहे.

### • भगवान भक्ती गडावर देखील जय्यत तयारी

भाजपाच्या नेत्या पंकजा मुंडे यादेखील दरवर्षी दसरा मेळावा घेतात. त्यांचा हा मेळावा बीड जिल्ह्यातील भक्तीशक्ती गडावर होत असतो. यावेळीही पाटोदा तालुक्यातील सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगडावर दसरा मेळाव्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. या मेळाव्यासाठी भव्य मंच उभारण्यात येणार असून मंडपही टाकला जाणार आहे. या मेळाव्यासाठी हेलिपॅड देखील तयार करण्यात आले असून हेलिकॉप्टरने मंत्री पंकजा मुंडे ११ वाजता मेळाव्याच्या ठिकाणी दाखल होतील. सकाळी ११ वाजून १५ मिनिटांनी त्या ध्यान मंदिरात जाऊन पूजा करतील. त्यानंतर ११.३० वाजता मूर्तीपूजन करुन ११.४५ वाजता उपस्थितांना संबोधित करतील.

### • संघाच्या शस्त्रपूजनाकडेही विशेष लक्ष

यंदा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे दसऱ्याच्या दिवशी संघातर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या कार्यक्रमाला विशेष महत्त्व असणार आहे. दसऱ्याच्या दिवशी संघाकडून शस्त्रपूजन केले जाते. यंदाच्या विजयादशमीपासून संघाच्या शताब्दी वर्षाची सुरुवात होणार आहे त्यामुळे सरसंघचालक मोहन भागवत आपल्या भाषणात स्वयंसेवकांना नेमका कोणता उपदेश करणार, याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. या कार्यक्रमाला माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे रामनाथ कोविंद यांच्या भाषणाकडेही संपूर्ण देशाचे लक्ष असेल.

### • धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या कार्यक्रमाचीही जय्यत तयारी

संघाच्या दसरा मेळाव्यासोबतच दरवर्षी नागपुरात दसऱ्याच्या दिवशी दीक्षाभूमीवर धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या कार्यक्रमाचीदेखील जय्यत तयारी चालू आहे. २ ऑक्टोबर रोजी नागपुरात पाऊस येण्याची शक्यता असल्याने या सोहळ्याला येणाऱ्या लाखो अनुयायांची व्यवस्था दीक्षाभूमीच्या परिसरातील शाळा, कॉलेज आणि समाज भवनानमध्ये केली जाणार आहे. त्यासाठी प्रशासनाने तयारी केली असून शाळा ताब्यात घेण्यात आल्या आहेत. शाळांच्या परिसरात सौचालय आणि इतर व्यवस्था केल्या जात आहेत. ६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने देशभरातून लाखोच्या संख्येने अनुयायी दीक्षाभूमीवर येणार आहेत. त्यासाठी ठिकठिकाणी भोजनदानाची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच पाऊस आल्यास राहण्याची व्यवस्थाही करण्यात येत आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# पूरग्रस्त राजापूर करांना डॉ.राम धुमक यांच्याकडून मदतीचा हात: पिण्याच्या एक हजार बॉटल देऊन जपली माणुसकी



**तलवाडा । प्रतिनिधी**

राजापूर गावाला पुराच्या पाण्याने वेढा घातला होता याठिकांचा संपर्क तुटल्याने त्यांना स्थलांतर होण्याची वेळ आली होती,घरात,दरात,आणि गावात पाणी गेल्याने अन्न,पाणी याची समस्या उभी होती याची जाणीव तलवाडा येथील उच्चशिक्षित डॉ.राम धुमक यांनी मनात ठेवत माणुसकीची जपली असून राजापूर येथील नागिकांना पिण्याच्या एक हजार बॉटल वाटप केल्या आहेत.यांचा आदर्श घेऊन समाज बांधवांनी पूरग्रस्त भागात मदतीसाठी पुढे यावे अशी चर्चा होत आहे. गोदाकाठच्या गावात आणि घरात पुराचे पाणी शिरल्याने तेथील जनजीवन विस्कळीत झाले होते आता पाणी हळूहळू कमी होत असून नागरिकांचे जनजीवन हळूहळू पूर्ववत होत आहे मात्र पुराच्या पाण्यामुळे विहिरी, बोर,चे पाणी सध्या खराब झाले आहे त्यामुळे या गावात तसेच पूरग्रस्त भागात पिण्याच्या पाण्याची आवश्यकता आहे याची जाणीव मनात ठेवत आपल्या माणुसकीच्या दृष्टीने गोदाकाठी असलेल्या मिरगाव चे भूमिपुत्र तलवाडा येथील मातोश्री क्लिनिक चे डॉ.राम धुमक हे मदतीसाठी धावून गेले असून राजापूर येथे पिण्याच्या पाण्याचे शंभर बॉक्स नागरिकांना वाटप केले आहे. त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे यावेळी राजापूर गावचे सरपंच भास्कर गवते, बाळू गवते,सर्जेराव शेळके यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

## गोल्डमॅन डॉ. रोहितजी पिसाळ ठरणार धम्मपरिषदेचे आकर्षण

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.भदंत आनंद कौसल्यायन नगर येथे गुरुवार (ता.२) ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत अखिल भारतीय सहावी बौद्ध धम्म परिषद आयोजित करण्यात आली आहे. त्या परिषदेला उद्योजक गोल्डमॅन डॉ.रोहित पिसाळ उपस्थित राहणार आहेत. प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था बीडच्या विद्यमाने, ६९ व्या अनुप्रवर्तन दिनाच्या अनुषंगाने ही बौद्ध धम्म परिषद आयोजित करण्यात आली आहे. या धम्मपरिषदेचे संयोजक तथा संस्थेचे सचिव भिक्खु धम्मशील थेरो यांनी अतिशय भव्यदिव्य आयोजन आणि नियोजन केले आहे. या धम्मपरिषदेचे खास आकर्षण गोल्डमॅन डॉ.रोहित पिसाळ असणार आहेत. कारण पाण्यातून सोने बनविणाऱ्या जगातील ज्या तीन कंपनी आहेत. त्यामध्ये डॉ.रोहित पिसाळ यांचा समावेश आहे.त्यांच्या गळ्यातील दीड किलोची सोन्याची बौद्ध मूर्ती यामुळे ते चर्चेत आले. परंतू अतिशय कठीण परिस्थितीतुन उभा केलेले सोन्याचे साम्राज्य नवउद्योजक आणि तरुणांना प्रेरणा देणारे आहे.

## माजलगावात एस टी आरक्षणासाठी धनगर समाजाची मोटरसायकल रॅली आणि रस्ता रोको आंदोलन

**माजलगाव । प्रतिनिधी**

धनगर समाजाच्या एस.टी. आरक्षणाची तात्काळ अंम लबजावणी करण्यात यावी या जिव्हाळ्याच्या मागणीसाठी म ल्हार योद्धे दीपक भाऊ बोराडे यांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाला १५ दिवस पूर्ण झाले आहेत. या आंदोलनाच्या समर्थनार्थ म ाजलगाव शहरात दि.१ ऑक्टोंबर बुधवार रोजी मोटारसायकल रॅली तसेच वसंतराव नाईक चौकात चक्काजाम रस्ता रोको आंदोलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. मोटारसायकल रॅलीची सुरुवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, केसापुरी कॅम्प येथून झाली. ही रॅली छत्रपती संभाजी महाराज चौक साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक छत्रपती शिवाजी महाराज चौक विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक मौलाना आझाद चौक मार्गे या मुख्य रस्त्यावरून वसंतराव नाईक चौक माजलगाव चौफाळा येथे पोहोचली. त्यानंतर चौफाळा येथेच सकल धनगर सम



ाज बांधवांच्या वतीने रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. या वेळी समाज बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग घेत जोरदार घोषणाबाजी केली. आंदोलनस्थळी सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने तुकाराम येवले,प्रा.प्रकाश गवते, विजय धायगुडे, रामभाऊ आबुज,अशोक डोणे, विलास नेमाने, विशाल देवकते,मुक्तीराम आबुज,याचे यथेचित भाषणे व मार्गदर्शन झाले. या प्रसंगी समाजातील सर्व घटकांनी एकजूट दर्शवली. यानंतर सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने महसूल प्रशासन व पोलीस प्रशासनाला रीतसर निवेदन देण्यात आले. आंदोलन शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. सम ारोप प्रसंगी सर्व उपस्थित बांधवांचे आभार व्यक्त करण्यात आले. तसेच शासनाने तातडीने धनगर सम ाजाच्या आरक्षणाबाबत निर्णय न घेतल्यास पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला. ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालक कोळी व पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त केला

## सामाजिक कार्यकर्ते तथा कवी संजय सपाटे यांच्या वाढदिवसानिमित्त ५१ ड्रेसचे वाटप



**दिंद्रुड परिसरातील प्रतिष्ठित तथा सामाजिक कार्याची आवड असणाऱ्या प्रत्येक व्यक्तींनी आपला व आपल्या कुटुंबातील सदस्याचा वाढदिवस साजरा करताना सामाजिक दायित्व निभावण्याच्या उद्देशाने गावाचे पवित्र मंदिर असलेल्या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान द्यावे. यासाठी दानशूर व्यक्तींनी पुढे येणे गरजेचे आहे.: आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते, संजय सपाटे.**

### ● जिल्हा परिषद केंद्रीय शाळेत राबवला सामाजिक उपक्रम

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक (कन्या-मुलांची) शाळेत येथील आई प्रतिष्ठान चे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते संजय सपाटे यांच्या वाढदिवसा निमित्त स्वखर्चाने मोफत ५१ ड्रेसचे वाटप करण्यात आले. यावेळी इतर कोणताही नाहक खर्च न करता वाढदिवस सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. सामाजिक कार्यात योगदान दिल्याने कवी सपाटे यांचे परिसरात कौतुक होत आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी येथील उद्योजक सुरेश पासंगे होते तर केंद्रीय मुख्याध्यापक वशिष्ठ मुंडे व मंचक सोळंके, प्रशांत कुलकर्णी, रुस्तुम ठोंबरे, सय्यद शायक, सुनील काटकर, भास्कर देशमाने सह दिंद्रुड पत्रकार संघाची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना कवी संजय सपाटे यांनी म्हटले की, सामाजिक कार्यासाठी आमचे नेहमी योगदान राहिले आहे व यापुढेही राहील. तसेच त्यांनी संजीवनी मल्टीस्टेटचे चेअरमन सुरेश पासंगे यांच्या वाढदिवसानिमि त्त असाच सामाजिक उपक्रम राबवून शाळेला योगदान देऊ असा शब्द यावेळी दिला. सध्याच्या युगात वाढदिवस म्हटलं की तोफा, फटाके, हार, तुरे व बॅनर बाजी केली जाते तसेच डीजे लावून जल्लोष साजरा केला जातो. हा नाहक खर्च टाळून दिंद्रुड येथील सामाजिक कार्यकर्ते संजय सपाटे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद केंद्रीय शाळेतील गोरगरीब, गरजू मुला-मुलींना ५१ टि शर्ट व पॅन्टचे वाटप करून वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा केला. उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते सर्वसामान्य कुटुंबातील गरजवंत विद्यार्थ्यांना ड्रेस देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार संतोष स्वामी यांनी तर आभार सहशिक्षक मनोहर कटारे यांनी व्यक्त केले. यावेळी कन्या व मुलांची दोन्ही शाळेचे सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. कवी संजय सपाटे यांनी सामाजिक उपक्रम राबवत अनोख्या पद्धतीने वाढदिवस साजरा केल्याने त्यांच्यावर कौतुकांचा, शुभेच्छांचा वर्षाव होत होता.

## अतिवृष्टीग्रस्त गावांना ग्लोबल विकास ट्रस्टकडून मदतीचा हात

**दसरा - दिवाळी साजरी करता यावी यासाठी हजारो किराणा किटचे शेतकरी कुटुंबियांना वाटप**

**परळी वै । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांचे दुःख वाटून घेता येणे अशक्य आहे. नैसर्गिक संकटे आणि आपत्तीशी नेहमी संघर्ष करावा लागलेल्या बळीराजाचे दुःख डोंगराएवढे मोठे असून यंदाच्या अस्मानी संकटाने शेतकरी राजा पूर्णतः कोसळला आणि ढासळला आहे. झालेल्या अतिवृष्टीने शेतातील पिके वाहून गेली, त्याबरोबरच शेतातील सुपीक मातीही खरवडून वाहून गेली. अनेक गावांतील नद्या नाले तुडुंब वाहिल्याने मोठे नुकसान झाले आहे. यामुळे दबलेला आणि खचलेला शेतकरी दसरा आणि दिवाळी काशी साजरी करणार ? ऐन सणासुदीच्या दिवसांत अतिवृष्टीने त्याच्या आनंदावर विरजण पडले. अशा अवस्थेत जलनायक मयंक




गांधी यांनी स्थापित केलेली ग्लोबल विकास ट्रस्ट ही संस्था शेतकऱ्यांच्या मदतीला धावून आली आहे. मोतीलाल ओसवाल फाऊंडेशन आणि बोरोसिल रिन्यूबल्सच्या सहकार्याने नुकसानग्रस्त शेतकरी कुटुंबियांना किराणा किटचे वाटप करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना छोटीसी मदत म्हणून हा उपक्रम राबविण्यात येत असून याचा बुधवार दिनांक ०१ ऑक्टोबर रोजी भिलेगाव येथून जलनायक मयंक गांधी यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. ३ हजार पेक्षा जास्त शेतकरी कुटुंबियांना याचा थेट लाभ होणार आहे. जगाचा पोशिंदा असलेल्या बळीराजाचे दुःख आणि परिस्थिती पाहून मनाला अतिव वेदना होतात. मी गावोगावी जाऊन जेंव्हा परिस्थिती पाहिली तेंव्हा मात्र मला रात्रभर झोप लागली नाही. आज सणासुदीच्या काळात शेतकरी संकटात सापडल्याने त्यांचे कुटुंबीय आणि मुलाबाळांचा आनंद हिरावून घेतल्याप्रमाणे झाले होते.

## कार्तिक लेहणे याचा सर्वात मोठा शो सुपर डान्सर मध्ये सहभाग व निवड : शिल्पा शेट्टी, भाग्यश्री यांनी केले कौतुक




**बीड । प्रतिनिधी**

येथील कार्तिक ज्ञानेश्वर लेहणे याने सोनी टेलिव्हिजन वरील डान्स रियालिटी शो सुपर डांसर मध्ये यश मिळवले आहे. त्याची आता सुपर डांसर सीजन सहा मध्ये निवड झाली आहे. बीड येथील तुळजाई नगर मधील रहिवासी कार्तिक ज्ञानेश्वर लेहणे याने आपल्या नृत्य कौशल्याने सर्वांचीच मने जिंकली आहेत. कार्तिक याने यापूर्वी मी होणार सुपरस्टार जल्लोश ज्युनियर चा या मराठी शो मध्ये हि सिने अभिनेता अंकुश चौधरी सोबत काम केले तसेच विविध स्पर्धांमध्ये यश मिळवले असून दिनांक २७ व २८ सप्टेंबर रोजी सोनी टेलिव्हिजन वरील सुपर डान्सर शो मध्ये त्याने नृत्य सादर केले.. त्याच्या या नृत्य कौशल्याचे कौतुक अभिनेत्री शिल्पा शेट्टी गीता माँ व भाग्यश्री यांनी केले. या वेळी शिल्पा शेट्टी यांनी कार्तिक याची सुपर डान्सर सीजन सहा साठी निवड देखील जाहीर केली. राज्यभरातून केवळ दोनच मुले सुपर डांसर मध्ये सहभागी झाले आहेत तर मराठवाड्यातील कार्तिक हा एकमेव आहे. कार्तिकेने सादर केलेले नृत्य प्रसिद्ध कोरिओग्राफर तुषार शेट्टी यांनी कोरिओग्राफ केले होते. कार्तिक याने मिळवलेल्या या यशाबद्दल त्याचे अभिनंदन केले जात आहे.

### सौ.के.एस.के. महाविद्यालयाचे केंद्रीय युवक महोत्सवात घवघवीत यश

**बीड । प्रतिनिधी**

सौ. के.एस.के. महाविद्यालयाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या केंद्रीय युवक म होत्सवात तब्बल सहा पारितोषीके प्राप्त झाले आहेत. यात मिमीक्री तालवाद्य, लोकवाद्यवृंद, पाश्चात्य तालवाद्य, प्रहसन या कला प्रकारांचा समावेश आहे.

## विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करा: अविनाश डरफे

### ● एन.एस.यू.आय चे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

सध्या राज्यातील विविध ठिकाणी अतिवृष्टी आल्यामुळे पुरामुळे संपूर्ण जिल्हाभरात जीवन विस्कळीत झालेले आहे. शेकडो गावे पाण्याखाली असून हजारो कुटुंब बेघर झाले आहेत. शेतकऱ्यांची पूर्ण पिके वाहुन गेली आहेत. या गंभीर परिस्थितीस परिणाम विद्यार्थ्यांच्या शालेय व शैक्षणिक जीवनात झाला असून यामध्येच शाळा, कॉलेज, महाविद्यालयीन खर्च पण विद्यार्थ्यांचे पालक भरू शकत नाहीत. यामधूनच विद्यालयीन प्रशासन विद्यार्थ्यांकडून विविध शुल्कांचा आर्थिक बोजा लादत आहे. विद्यार्थ्यांना दिलासा म्हणुन




प्रवेश शुल्क, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, नोंदणी शुल्क, वसतिगृह शुल्क आदी सर्व प्रकारचे शुल्क आपत्तीग्रस्त कुटुंबांना झेपणारे नाहीत. गरीब शेतकरी व मजूरी काम करत असणाऱ्या पालकांची मूल हे शुल्क या नैसर्गिक आपत्तीम ुळे भरू शकत नाहीत. त्यामुळे सर्व शुल्क माफीची मागणी बीड जिल्हा एनएसयूआय च्या वतीने जिल्हाधिकारी यांना करण्यात आली. यावेळी एनएसयूआय चे जिल्हा अध्यक्ष अविनाश डरफ े, महाराष्ट्र काँग्रेचे सरचिटणीस दादासाहेब मुंडे, प्रदेश सचिव गणेश राऊत, युवा नेते राहुल टेकाळे, छडणख प्रभारी असदुद्दीन शेख तालुका अध्यक्ष गणेश बाजगुडे, गणेश जवकर संतोष निकाळजे, मुकुंद लोणकर, संतोष गाडे बबलू जगताप शाम डरफे संतोष मते,रोहित घोडके,रोहन साळुंके अतिश घोलप, व NSUI चे पदाधिकारी उपास्थित होते.

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री. व्ही. डी. गिते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

किरकोळ दिवाणी अर्ज १२९८ / २०२५

तुषार पि. रावसाहेब गुजर व इतर विरुध्द निरंक

अर्जदार :- १. व्दारकाबाई लिंबाजी उबाळे, वय ५० वर्षे, धंदा-घरकाम, रा. नाथापुर, ता. जि. बीड, २. संदिप पि. लिंबाजी उबाळे, वय-२७, वर्षे, धंदा-शेती. रा. सदर. ३. दिपक पि. लिंबाजी उबाळे, वय-२५ वर्षे, धंदा-शेती. रा. सदर. (अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

मागणी अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत लिंबाजी पि. आसाराम उबाळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत लिंबाजी पि. आसाराम उबाळे यांचा मृत्यु दिनांक ०८.०७.२०२५ रोजी नाथापुर ता. जि. बीड झाला असुन अर्जदार क ०१ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क २ व ३ हे मयताचे मुले आहेत. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की. जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट मदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत लिंबाजी पि. आसाराम उबाळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८ ऑगस्ट २०१६ रोजी माझ्या महीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २६ सप्टेंबर २५

(मार्फत- ॲड. वाय आर शेळके)

शिक्का

(स्वाक्षरीत) क. लिपीक

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ४३९/२०२५

संतोष ज्ञानोबा करे विरुध्द ग्रा.पं.कार्या.आहेरचिंचोली

पहा,

१. संतोष ज्ञानोबा करे, रा. आहेरचिंचोली, ता.जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक राहुल संतोष करे यांचा दिनांक १७/०६/२०१६ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास आहेरचिंचोली, ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्राम पंचायत कार्यालय मौजे आहेरचिंचोली, ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०५/०९/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०५/१०/२०२५ ही आहे.

शिक्का

(स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • गुरूवार, दि. ०२ ऑक्टोबर २०२५ • पान ४

## थोडक्यात...

### सन्मान नवदुर्गांचा या उपक्रमांतर्गत स.पो.नि.वर्षा व्हगाडे,पत्रकार गितांजली लव्हाळे या कर्तबगार महिलांचा सन्मान



**वडवणी । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा तथा राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ.रूपाली निलेश चाकणकर व राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाच्या बीड जिल्हाध्यक्षा सौ. प्रज्ञाताई कोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी येथील राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाच्या तालुकाध्यक्षा सौ.दीक्षाताई डोंगरे यांनी 'सन्मान नवदुर्गांचा' या उपक्रम ंतर्गत वडवणी येथील कर्तबगार महिलांना मानपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. समाजातील सामाजिक कार्यासाठी झोकून देऊन काम करणाऱ्या नवदुर्गांचा प्रभाव समाजातील मोठ्या घटकावर होत असतो त्यांच्या प्रेरणेतून सशक्त समाजाची निर्मिती होत असते आपल्या कार्यामुळे शैक्षणिक,वैद्यकीय,सांस्कृतिक यासह अनेक क्षेत्रात देशाच्या जडणघडणे मध्ये अमूल्य योगदान देणाऱ्या वडवणी येथील,पोलीस स्टेशनच्या सा.पो. नि.वर्षा व्हगाडे मॅडम तसाच दैनिक लोकनायकच्या उपसंपादिका सौ. गितांजली लव्हाळे मॅडम, उद्योजक अशा या कर्तबगार महिलांना नवरात्र उत्सवाचे औचित्य साधून राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाच्या वडवणी तालुकाध्यक्षा दीक्षाताई डोंगरे यांनी सन्मान नवदुर्गांचे मानपत्र देऊन सन्मान केला.

### चौसाळा येथे परंपरेच्या झेंड्याचे ध्वजारोहण, विजयादशमी मिरवणूक संपन्न होणार आहे



**चौसाळा । प्रतिनिधी**

गावातील परंपरेच्या आणि मानाच्या फकीरी पांढरी झेंड्याचे ध्वजारोहण सालाबाद प्रमाणे दसरा (विजयादशीमी) दिवशी गुरूवार रोजी ८ ते १० या वेळात सकाळी होणार आहे. जुनी वेस म्हणजेच आत्ताचा जयहिंद चौक पासून ते जुनी गडी (ध्वजारोहण) ठिकाणापर्यंत झेंड्याची वाजत गाजत उत्साहाने मिरवणुक होणार आहे, सर्व मानकऱ्यांच्या उपस्थीतीत ध्वजारोहण होणार आहे. तसेच सालाबाद प्रमाणे याही वर्षी चौसाळा येथील रोडवरील मारुती मंदिरापासून दुपारी ठीक साडेचार वाजता वाजत गाजत सिमोलंघाना साठी तुळजाभवानी मंदिरापर्यंत सर्व मानकर यांच्या उपस्थितीत राहावे मिरवणूक निघणार आहे या मिरवणुकीम ध्ये सर्वांनी मिळून तुळजाभवानी मंदिरापर्यंत चालत जावयाचे आहे तरी या मिरवणुकीत सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन मानकरी बळीराम नाईकवाडे चंद्रसेन गुंजाळ, विकास पाटील, डॉक्टर दिलीप मोटे, त्र्यंबक जोगदंड, प्रसाद ( बाबू ) देशमुख यांनी केले आहे तरी चौसाळा येथील सर्व सुजाण नागरिकांनी या सभारंभास आपण उपस्थीत राहावे ही विनंती करण्यात येत आहे.

### चौसाळा पिंपळगाव जोडणारा पूल तात्काळ दुरुस्त करा-दत्तात्रय नाईकवाडे



**चौसाळा । प्रतिनिधी**

पिंपळगाव जोडणारा पूल वाहून गेला आहे. या दुर्घटनेमुळे स्थानिक नागरिकांच्या वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झाला आहे. वाढवना,पिंपळगाव,रुइगव्हाण,माळेवाडी ,माणेवाडी या गावाला जोडणारा पूल वाहून गेल्यामुळे नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असून, जीवितहानी झाल्यास कोणाला जबाबदार धरणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे. या संदर्भात, संबंधित बांधकाम विभाग किंवा प्रशासनाला या घटनेच्या दुरुस्तीसाठी किंवा पुनर्बांधणीसाठी तातडीने पावले उचलावी व पूल तात्काळ दुरुस्त करावा अशी मागणी सेवा सोसायटीचे चेअरमन दत्तात्रय नाईकवाडे यांनी केली. आहे. शाळा-कॉलेजला जाणारे विद्यार्थी, शेतकरी तसेच रुग्णांना वेळेवर उपचार मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. स्थानिक नागरिकांमध्ये मोठी नाराजी असून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. पाच गावे जोडणारा पूल वाहून गेल्याने राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार साहेब यांनी भेट दिली होती व तात्काळ पूल दुरुस्त करण्याचे सूचना दिल्या होत्या. आज आमदार रोहित दादा पवार यांनी पुलाची पाहणी केली.नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. उद्या काही घटना घडली त्याला जबाबदार कोण असा सवाल उपस्थित होत आहे.पूल तात्काळ दुरुस्त करून नुकसान टाळावे, अशी मागणी होत आहे.

### ओला दुष्काळ' जाहीर करण्याच्या मागणीसाठी वडवणी तहसीलवर महाविकास आघाडीचा...

# 'शेतकरी बैलगाडा आक्रोश मोर्चा'



**• प्रमुख मागण्या •**

ओला दुष्काळ जाहीर करावा, बळीराजाला सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान त्वरित जाहीर करावे, पावसात मृत्यमुखी पडलेल्या गाय, म्हैस, बैल यासाठी ५० हजार रुपये मदत द्यावी, शेळी, मेंढी यांसाठी १५ हजार रुपये मदत द्यावी, खतांवरील जीएसटी (GST) रद्द करण्यात यावा, पीक विमा तात्काळ मंजूर करून देण्यात यावा, पिम. एम. सि. एम. चे वंचित शेतकऱ्यांना तात्काळ वितरण करण्यात यावे, शेतकऱ्यांना सरसकट कर्ज माफी करा.

**वडवणी । प्रतिनिधी**

अतिवृष्टी आणि सततच्या पावसामुळे पिकांचं प्रचंड नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनी 'ओला दुष्काळ' त्वरित जाहीर करावा या प्रमुख मागणीसह विविध मागण्यांसाठी महाविकास आघाडीच्या नेतृत्वाखाली वडवणी तहसील कार्यालयावर 'शेतकरी बैलगाडी आक्रोश मोर्चा' काढण्यात आला होता. दि.०१/१०/२०२५ बुधवार रोजी महाविकास आघाडीच्या वतीने वडवणी तहसील कार्यालय येथे शेतकरी बांधवांच्या न्यायासाठी भव्य शेतकरी बैलगाडा आक्रोश मोर्चा काढण्यात आला. ओला दुष्काळ घोषित करावा, सरसकट कर्जमुक्ती करावी आणि शेतकऱ्यांना सरसकट ५० हजार रुपये हेक्टरी अनुदान द्यावे, पावसामुळे व पुराच्या पाण्यामुळे मृत्युमुखी पडलेल्या गाय, बैल, म्हैस यांची भरपाई म्हणून शेतकऱ्यांना ५० हजार रुपये मदत जाहिर करावी, शेळी मेंढी

▶ उर्वरित पान २ वर

# धनगर समाज आरक्षणासाठी लिंबागणेश येथे रास्ता रोको आंदोलन



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

धनगर समाजाला एस.टी. प्रवर्गातील आरक्षणाची अंमलबजावणी करावी, या प्रमुख मागणीसाठी जालना येथे मागील १५ दिवसांपासून धनगर समाजाचे नेते दिपकभाऊ बो-हाडे बेमुदत आमरण उपोषणास बसले आहेत. त्यांच्या आदेशानुसार आज राज्यभरात धनगर समाजाकडून चक्काजाम आंदोलन करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे अहमदपूर-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्ता रोको आंदोलन ▶ उर्वरित पान २ वर

### म्हाळसजवळा रोहयो कामांवर चौकशीचा बडगा; ज्ञानेश्वर खांडे यांच्या तक्रारीनंतर मंत्र्यांचा थेट आदेश!

### म्हाळसजवळा येथील ५४ कामांवर चौकशीची झडती

**बीड । प्रतिनिधी**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अनुषंगाने शिवसेना उपजिल्हाप्रमुख श्री. ज्ञानेश्वर रामेश्वर खांडे पाटील, मौजे म्हाळसजवळा ता. जि. बीड यांच्याकडून रोहयो मंत्री भरत शेठ गोगावले यांच्याकडे लेखी तक्रार देण्यात आली होती. म्हाळस जवळा येथील रोहयो कामाची सबंधित तक्रार देण्यात आली होती. उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाच्या प्रचलित नियम व धोरणानुसार सदर अर्जावर उचित कार्यवाही करावी व सदर तक्रारीचा त्वरीत निपटारा करावा. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत तक्रारदारास परस्पर कळवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास ▶ उर्वरित पान २ वर

# लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना चालु गळीत हंगामात 10 लाख मे.टन. ऊसाचे गाळप करणार : चेअरमन विरेंद्रदादा सोळंके



**माजलगाव । प्रतिनिधी**

लोकनेते स्व. सुंदररावजी सोळंके साहेब यांनी तीन दशकांपूर्वी चालु केलेला लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना ऊस उत्पादकांच्या सहकार्याने स्थापनेपासुन अविरत गाळप करत असुन यंदाही पुर्ण क्षमतेने आपला हा कारखाना गाळप हंगामासाठी सज्ज झाला असुन चालु हंगामात १० लाख मे. टन ऊस गाळपाचे उधिष्ठ ठेवण्यात आले आहे तरी हे उद्दिष्ठ पुर्तीसाठी ऊस उत्पादकांनी आपला ऊस इतरत्र न देता आपल्याच हक्काच्या लोकनेते सुंदररावजी सोळंके कारखान्यास द्यावा असे आवाहन चेअरमन विरेंद्रदादा सोळंके यांनी केले. तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचा सन.२०२५-२६ ऊस गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदिपन समारंभ काल दि.१ ऑक्टोबर, २०२५ रोजी ह.भ.प.श्री. महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या शुभहस्ते व माजलगाव मतदार संघाचे लोकप्रिय आ. प्रकाशदादा सोळंके व जेष्ठ नेते धैर्यशिलकाका सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चेअरमन श्री. विरेंद्रदादा सोळंके होते तर व्हा. चेअरमन श्री. जयसिंगभैय्या सोळंके, श्री. भगवानराव लगे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कारखान्याचे संचालक डॉ. श्री. दत्तात्रय दुधाने व त्यांच्या पत्नी सौ. अंजनाताई दत्तात्रय दुधाने या उभयतांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले.

या प्रसंगी प्रास्ताविक करताना चेअरमन श्री. विरेंद्रदादा सोळंक यांनी ▶ उर्वरित पान २ वर

# सांडस चिंचोली येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन



**• लेंडाळ हॉस्पिटलच्या वतीने पूरग्रस्तांसाठी एक मदतीचा हात; पूरामुळे स्थलांतरित झालेल्या नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी व उपचार सेवा**

**माजलगाव । प्रतिनिधी**

मराठवाड्यासह बीड जिल्ह्यात तीस वर्षानंतर तुफान मुसळधार पाऊस पडल्यामुळे पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झाली असून माजलगाव तालुक्यातील सांडस चिंचोली या गावाता पुराच्या पाण्याने अक्षरशः वेडा घातलेली परिस्थिती निर्माण झालेली आहे गावातील लोकांचे जनजीवन विस्कळीत झाले होते सर्व प्रतिष्ठित नागरिक व्यापारी सर्व पक्ष संघटना यांच्या वतीने सांडस चिंचोली या गावाता मदत करणे चालु आहे. पूर परिस्थिती निर्माण झाल्यामुळे गावात सर्दी, ताप, खोकला, डोकेदुखी अश्या समस्या उद्भवल्यामुळे पूरग्रस्त बांधवांच्या निरोगी आरोग्यासाठी आणि साथीचे रोग पसरू नये यासाठी काल दिनांक ०१ ऑक्टोबर रोजी गावाला पाण्याचा वेडा असताना देखील गावात गाडी ▶ उर्वरित पान २ वर

### पिंपळनेर भागात दुमदुमला 'उदे ग अंबे उदे'चा जयघोष; आदिशक्तीचा जागर

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

देवीच्या दर्शनासाठी पारंपरिक वेशभूषेत आलेल्या महिला-युवतींनी देवीकडे मांगल्य, सुख-समृद्धी नांदण्याची केलेली प्रार्थना आणि मंदिरांमध्ये दुमदुमलेला 'उदे ग अंबे उदे'चा जयघोष... असे उत्साही वातावरण मंगळवार व बुधवारी मंदिरांमध्ये पाहायला मिळाले. नवरात्रोत्सवाच्या नवव्या माळेला मंदिरांमध्ये महिला-युवतींची दर्शनासाठी गर्दी पाहायला मिळाली. ग्रामदैवत तुळजा भवानी माता देवस्थान, महालक्ष्मी मंदिर ,स्वामी समर्थ मंदिर,गुगळादेवी, लिंबारूई देवी अशा विविध मंदिरात दर्शनासाठी गर्दी झाली. घरोघरीही महिला-युवतींनी देवीची आराधना केली. तर मंडळांच्या ठिकाणी वैविध्यपूर्ण कार्यक्रम रंगले तर उत्सवानिमित्त सायंकाळी महिला-युवतींच्या हस्ते देवीची आरती करण्यात आली. नवरात्रोत्सवात ठरलेल्या रंगाप्रमाणे महिला-युवतींनी खास हिरव्या रंगाचा पेहराव केला होता. घरी पूजा-अर्चा झाल्यानंतर सायंकाळनंतर महिला-युवतींनी मंदिरांमध्ये येऊन देवीचे दर्शन घेतले, भजन किर्तन, प्रवचन तसेच भक्तीगीतांच्या कार्यक्रमांसह सांस्कृतिक कार्यक्रम रंगले. फुलांच्या सजावटीने आणि रंगबिरंगी पताक्यांच्या सजावटीने लक्ष वेधले. मंदिरात नवरात्रोत्सवाचा उत्साह पाहायला मिळाला. घरोघरीही सहकुटुंब एकत्र येऊन देवीची आराधना

▶ उर्वरित पान २ वर

# सफाई कामगारांची नियमित नियुक्तीपत्राची मागणी साठी पाटोदा नगरपंचायतीला कामगारांनी ठोकले कुलूप!




**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा नगरपंचायत हद्दीमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून सफाई कामगार म्हणून कार्यरत असलेल्या महिला व पुरुष कर्मचाऱ्यांना अद्यापही शासन निर्णय २०१६ नुसार नियमित नियुक्तीपत्र मिळालेले नाही. या गंभीर प्रश्नाकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप कामगारांनी केला आहे.या कारणामुळे बुधवारी दिनांक ०१ ऑक्टोबर २०१५ रोजी सकाळपासून नगरपंचायतीच्या मुख्य प्रवेशद्वाराला कुलूप ठोकून सफाई कामगारांनी काम बंद आंदोलन छेडले. नियुक्तीपत्र मिळावे, सेवेत स्थैर्य मिळावे यासाठी कामगारांनी जोरदार घोषणाबाजी केली.आंदोलनाला सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब जावळे यांनी पाठिंबा दर्शवला. यावेळी त्यांनी सांगितले की, सफाई कामगार हे शहराच्या स्वच्छतेचे खरे शिल्पकार आहेत. त्यांना शासन निर्णयाप्रमाणे योग्य न्याय मिळालाच पाहिजे. नगरपंचायत प्रशासनाने कामगारांचे प्रश्न तातडीने सोडवले पाहिजेत, अन्यथा लढा आणखी तीव्र केला जाईल.या आंदोलनात नगरपंचायतीतील सर्वच सफाई कामगार सहभागी झाले होते. कामगारांच्या या आंदोलनामुळे नगरपंचायत प्रशासनावर तातडीने कारवाई करण्याची वेळ आली आहे.